CR1995032713

(39) (95)

विषय:--स्थानिक स्वराज्य संस्था व प्राधिकरणांच्या क्षेत्रातील स्थावर मालमत्ताचे कर निर्धारण....

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग,

परिपत्रक क्र.नोंदणी--1093/2484/प्र.क्र.821/म--1,

मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 27 मार्च, 1995.

<u>परिपत्रकः</u>--

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एसटीपी--2189/प्र.क्र.673/भाग--2/म--1, दिनांक 2 डिसेंबर, 1989 अन्वये नोंदणी अधिनियम 1908 चे कलम 17 अन्वये कोणत्याही स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण विक्रीद्वारे, गहाणखताद्वारे, बक्षीसपत्राद्वारे, वाटणी पत्राद्वारे, भाडेपट्ट्याद्वारे, हक्कसोड पत्राद्वारे, न्यायालयाच्या डिक्रीद्वारे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे केल्यास सदर व्यवहारात नोंदणी सक्तीची आहे. असे स्पष्ट केलेले आहे. म्हणजेच स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण व्यवहार नोंदवितांना मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मधील तरतुदीनुसार विहित प्रमाणात मुद्रांक शुल्क व नोंदणी फी शासनास जमा करणे आवश्यक आहे, परंतु उपरोक्त शासन निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याचे आढळून आलेले असून त्यामुळे त्याचा शासनाच्या महसूलावर विपरित परिणाम होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

2. शासनाच्या महसूलाच्या दृष्टीने ही बाब क्षेत्रिय अधिका-यांनी दुर्लक्षित करणे योग्य नाही. तरी उपरोक्त नमूद केलेल्या शासन निर्णयाची (प्रत सोबत जोडलेली आहे.) वरील दोन्ही कायद्यांतर्गत तरतुदींचा विचार करुन शासनाचे महसूल उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोनातून अंमलबजावणी होणे आवश्यक आहे व त्या अनुषंगाने शासन पुन्हा असे आदेश देत आहे की, स्थावर मालमत्ता हस्तांतरणाबाबत नोंदणीकृत दस्तऐवजांची प्रमाणित नक्कल किंवा सदर दस्तऐवजांची सूचि क्र.2 ची प्रमाणित नक्कल पक्षकाराने दाखल केल्याशिवाय नगरपालिका/महानगरपालिकेच्या अभिलेखांवर कर आकारणीसाठी सदर मालमत्ता विकत घेणा-याच्या नावावर चढवू नये/करण्यात येवू नये.

3. हे आदेश नगरविकास विभागाच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स.भा.चिंदरकर

(स.भा.चिंदरकर)

अवर सचिव

महसूल व वन विभाग.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,

जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे,

सर्व महानगरपालिका आयुक्त,

सर्व नगरपालिका,

महानगरपालिका आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई,

प्रशासन महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई,

संचालक, नगररचना व मुल्यांकन, महाराष्ट्र राज्य, पुणे,

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे,

रोटा/एच--148(1,200-4-95)

(पुढे चालू

विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक मुंबई/नागपूर, नाशिक, औरंगाबाद, ठाणे,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी,
नगरविकास विभाग,
वित्त विभाग,
निवड नस्ती म-1 कार्यासन, महसूल व वन विभाग,
सर्व भूमी अभिलेख कार्यालये,
सर्व तहसिलदार,
सर्व उपविभागीय अधिकारी.

---

एच-148(1,200-4-95)-1अ.